# श्री शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, आकोट

## गृहअर्थशास्त्र विभाग

# गृहशास्त्र विभागात विविध स्वयंरोजगार या विषयावर व्याख्यानाचे आयोजन.

**कार्यक्रम घेण्याचे उद्देश-** स्वयंरोजगार अधिक उपयुक्त माहिती व्हावी.

दिनांक 26 .2 . 2015 रोजी गृह अर्थशास्त्र विभागात द्वारे व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाला प्रमुख वक्ते म्हणून डॉ. संध्या काळे, शंकरलाल खंडेलवाल महाविद्यालय अकोला या होत्या. त्यांनी गृह अर्थशास्त्रातील विविध स्वयंरोजगार या विषयावर व्याख्यान दिले. आपल्या व्याख्यानात त्यांनी स्वयंरोजगाराचा अर्थ, महत्त्व स्पष्ट केले. तसेच गृह अर्थशास्त्रातील विद्यार्थ्यांना स्वयंरोजगाराच्या अधिक संधी आहे. याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. आपल्या पावर पॉइंट प्रेझेंटेशन च्या माध्यमातून त्यांनी विद्यार्थिनींना योग्यरीत्या स्वयंरोजगार या विषयी माहिती दिली. यावेळी गृहअर्थशास्त्र च्या चाळीस विद्यार्थी हजर होत्या.






Dr. Sandhya Kale , S.K. College, Akola

# श्री शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, आकोट

## गृहअर्थशास्त्र विभाग

## गृहअर्थशास्त्र विभागाद्वारे किशोर अवस्थेतील आरोग्य व काळजी या विषयावर व्याख्यान.

**कार्यक्रम घेण्यामागे उद्देश**: विद्यार्थिनीमध्ये किशोरावस्थेत आरोग्यविषयक समस्येची जाणीव व्हावी व त्यादृष्टीने त्यांच्यात जागृकता यावी

दिनांक 14/09/2015 रोजी गृहअर्थशास्त्र विभागाद्वारे किशोरावस्थेतील आरोग्य व काळजी या विषयावर डॉ. भाग्यश्री वानखडे स्त्रीरोग तज्ञ अकोट यांचे व्याख्यान आयोजन करण्यात आले विद्यार्थिनींना किशोरावस्थेत आरोग्यविषयक समस्या भेडसावत असतात त्याची जाणीव व्हावी, तसेच त्यांच्यात या समस्यांविषयी जागृकता यावी हा उद्देश समोर ठेवून, या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. यावेळी डॉ. भाग्यश्री वानखडे यांनी आपल्या व्याख्यानात किशोरावस्थेतील शारीरिक, मानसिक बदल व आरोग्यविषयक समस्या यावर सविस्तर मार्गदर्शन केले. यावेळी ५५ विद्यार्थिनी या व्याख्यानासाठी हजर होत्या. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व आभारप्रदर्शन गृहअर्थशास्त्र विभाग प्रमुख प्रा. स्वाती वैद्य यांनी केले.



Dr. Bhagyashri Wankhade delivered lecture (14-9-2015)

# श्री शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, आकोट

## गृहअर्थशास्त्र विभाग

### गृहअर्थशास्त्र विभागाद्वारे कार्यसरलीकरण या विषयावर व्याख्यानाचे आयोजन.

कार्यक्रम घेण्यामागे उद्देश: विद्यार्थिनींना कार्यसरलीकरण संकल्पना अधिक स्पष्ट व्हावी, याकरिता व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले.

दिनांक 4 . 3 .2015 रोजी गृह अर्थशास्त्र विभागाद्वारे कार्यसरलीकरण या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. प्रा. सुषमा फरसुले, डॉ. गोपाळराव खेडकर महाविद्यालया तेल्हारा या प्रमुख मार्गदर्शक होत्या. प्रा. फरसुले यांनी कार्य सरलीकरण याचा अर्थ, व्याख्या, महत्त्व आणि आजच्या धकाधकीच्या युगात कार्यसरली करण्याची गरज विशद केली. वेळ, ऊर्जा यांचा योग्य उपयोग होण्याच्या दृष्टीने हे व्याख्यान अतिशय महत्वाचे आहे. कार्यसरलीकरण्याचा दैनंदिन कार्यक्रमात कसा उपयोग करता येतो. यावर विविध उदाहरणांद्वारे प्राध्यापक पळसुले यांनी विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले. विद्यार्थिनींना कार्यसरलीकरनाची संकल्पना अधिक स्पष्ट व्हावी, याकरिता व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. प्रा. स्वाती वैद्य यांनी या व्याख्यानाचे आयोजन केले. यावेळी ३५ विद्यार्थिनी हजर होत्या. या कार्यक्रमाची प्रस्तावना व आभार गृहअर्थशास्त्र विभागाच्या प्रमुख प्राध्यापक स्वाती वैद्य यांनी मानले.




# श्री शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, आकोट

## गृहअर्थशास्त्र विभाग

गहूअर्थशास्त्र विभागात द्वारे फास्ट फूड व त्याचे दुष्परिणाम या विषयावर व्याख्यानाचे आयोजन.

कार्यक्रम घेण्यामागे उद्देश : फास्ट फूड मुळे आरोग्यावर दुष्परिणाम होते . याची जाणीव विद्यार्थ्यांना करून देणे काळाची गरज आहे. हा उद्देश समोर ठेवून या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले.

दिनांक 5 मार्च 2016 रोजी गृह अर्थशास्त्र विभागाद्वारे प्रा. पुसाटे यांचे फास्ट फूड व त्याचे दुष्परिणाम या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. प्रा. सोसायट्यांनी फास्ट फूड ची संकल्पना स्पष्ट केली. फास्टफूड मधील विविध पदार्थ व त्याचे अतिसेवन हे आरोग्यासाठी कसे घातक आहे. याची सविस्तर माहिती विद्यार्थिनींना दिली. याला आवर घातले नाही तर, त्याचे दुष्परिणाम हे शरीरावर होतात. हे स्पष्ट केले यावेळी गृह अर्थशास्त्र विभागाच्या 50 विद्यार्थिनी हजर होत्या. या कार्यक्रमाची प्रस्तावना व पाहुण्यांचे आभार गृहअर्थशास्त्र विभाग प्रमुख, प्रा. स्वाती वैद्य यांनी मांडले



**Prof. Jyotsna Pusate delivered lecture (05-03-2016)**

# कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, आकोट

## गृहअर्थशास्त्र विभाग

### गृहअर्थशास्त्र विभागात द्वारे रक्तक्षय कारणे व उपाय या विषयावर व्याख्यानाचे आयोजन.

कार्यक्रम घेण्यामागे उद्देश: विद्यार्थिनींना रक्तक्षयाबद्दल संपूर्ण शास्त्रीय माहिती व्हावी व त्यांच्यात जागृती निर्माण व्हावी हा उद्देश समोर ठेवून, या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले.

दिनांक 28 जानेवारी 2016 रोजी गृहअर्थशास्त्र विभागाद्वारे रक्ताक्षयाची कारणे व उपाय या विषयावर प्रा. बबीता हजारे, नरशिग महाविद्यालय , अकोट. यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले. प्रा. बबीता हजारे यांनी रक्तक्षयाची कारणे, लक्षणे व त्यावरील उपाय याविषयी सविस्तर माहिती स्पष्ट करून, विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले. स्त्रियांमध्ये रक्तक्षयाचे प्रमाण अधिक असल्याने त्याची जाणीव विद्यार्थ्यांना करून दिली. याशिवाय विद्यार्थिनींनी कोणती काळजी घ्यावी, याचे मार्गदर्शन केले. या विषयी संपूर्ण शास्त्रीय माहिती त्यांनी विद्यार्थ्यांना दिली. यावेळी गृहअर्थशास्त्र विभागाच्या 40 विद्यार्थिनी हजर होत्या. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. स्वाती वैद्य यांनी केले तर आभार प्रदर्शन कु. गौर यांनी केले.




Professor Babita Hazare guided the students,

# श्री शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, आकोट

## गृहअर्थशास्त्र विभाग

## गृहअर्थशास्त्र विभागाद्वारे कार्यसरलीकरण या विषयावर व्याख्यानाचे आयोजन.

कार्यक्रम घेण्यामागे उद्देश: विद्यार्थिनींना कार्यसरलीकरण संकल्पना अधिक स्पष्ट व्हावी, याकरिता व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले.

दिनांक **4 . 3 .2015** रोजी गृहअर्थशास्त्र विभागाद्वारे कार्यसरलीकरण या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. प्रा. सुषमा फरसुले, डॉ गोपाळराव खेडकर महाविद्यालया तेल्हारा या प्रमुख मार्गदर्शक होत्या. प्राध्यापक फरसुले यांनी कार्य सरलीकरण याचा अर्थ, व्याख्या, महत्त्व आणि आजच्या धकाधकीच्या युगात कार्यसरली करण्याची गरज विशद केली. वेळ, ऊर्जा यांचा योग्य उपयोग होण्याच्या दृष्टीने हे व्याख्यान अतिशय महत्वाचे आहे. कार्यसरलीकरण्याचा दैनंदिन कार्यक्रमात कसा उपयोग करता येतो. यावर विविध उदाहरणांद्वारे प्रा. फरसुले यांनी विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले. विद्यार्थिनींना कार्यसरलीकरनाची संकल्पना अधिक स्पष्ट व्हावी, याकरिता व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. प्रा. स्वाती वैद्य यांनी या व्याख्यानाचे आयोजन केले. यावेळी ३५ विद्यार्थिनी हजर होत्या. या कार्यक्रमाची प्रास्तविक व आभार गृहअर्थशास्त्र विभागाच्या प्रमुख प्रा. स्वाती वैद्य यांनी केले.




Prof. Sushama Farsole – G.K. College, Telhara

# श्री शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, आकोट

## गृहअर्थशास्त्र विभाग

### गृहअर्थशास्त्र विभागाद्वारे विवाहपूर्व समुपदेशन या विषयावर व्याख्यानाचे आयोजन.

कार्यक्रम घेण्यामागे उद्देश: विद्यार्थिनींना विवाहपूर्व समुपदेशन होण्याची काळाची गरज आहे. याची माहिती मिळावी म्हणून कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

दिनांक **17 /10/2016** रोजी विवाहपूर्व समुपदेशन या विषयावर डॉ. संध्या काळे, शंकरलाल खंडेलवाल महाविद्यालय, अकोला यांचे व्याख्यान गृह अर्थशास्त्र विभागातद्वारे आयोजन करण्यात आले. डॉ. संध्या काळे यांनी विवाहपूर्व समुपदेशनाची गरज व महत्त्व का आहे याविषयी विवेचन केले. आज त्याची नितांत गरज आहे. याविषयी विद्यार्थ्यांना जागृत केले. यावेळी गृह अर्थशास्त्र विभागातील **55** विद्यार्थिनी होत्या. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक गृह अर्थशास्त्र विभागाच्या विभाग प्रमुख प्रा. स्वाती वैद्य यांनी केले. तर आभार प्रदर्शन कु. पूजा मामनकार यांनी केले.






Prof. Dr. Kale delivered lecture ( 17 -10- 2016)

## श्री शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, आकोट

## गृहअर्थशास्त्र विभाग

## ‘‘किशोरावस्था आणि आरोग्य’; या विषयावर व्याख्यान आयोजन

दि. ०७. ०२. २०१८ रोजी ‘‘किशोरावस्था आणि आरोग्य’; या विषयावर व्याख्यान आयोजीत करण्यात आले. डॉ. कल्पना पांडे, आकोट यांनी मार्गदर्शन केले. विध्यार्थीनींच्या आरोग्या विषयी समस्येचे या वेळी निराकरण करण्यात येवून आहार विषयक मार्गदर्शन करण्यात आले.

उदेश : विद्यार्थीनींना आरोग्य विषयक समस्यांची माहीती व्हावी व त्याचे निराकरण.

किशोरा अवस्थेत शारेरीक व मानसीक बदल होतात. या बदलांची माहीती विद्यार्थीनींना झाल्यास त्याचा सकारातमक परिणाम होवून अशा बदलांना सकारातमतेने सामोरे जातात व आचल्या आरोग्या विषयी जागरूक होतात. या वेळी डॉ. कल्पना पांडे यांनी विद्यार्थीनींच्या विविध आरोग्य विषयक समस्या जानुन घेवून त्यावर योग्य सल्ला व मार्गदर्शन केले. या वेळी गृह अर्थशास्त्राच्या विद्यार्थीनीं हजर होत्या.







डॉ. कल्पना पांडे, आकोट यांनी मार्गदर्शन करतांना.

# श्री शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, आकोट

## गृहअर्थशास्त्र विभाग

### गृहअर्थशास्त्र विभागाद्वारे राष्ट्रीय पोषण सप्ताह निमित्त कार्यक्रमाचे आयोजन.

उद्देश : विद्यार्थ्यांमध्ये आहार व आरोग्य विषयी जागरूकता निर्माण व्हावी हा या कार्यक्रम घेणे मागील उद्देश होता.

दिनांक 4 सप्टेंबर 2018 रोजी डॉ. रोहिणी अरबट दंतरोग तज्ञ खामगाव यांचे आहार आणि आरोग्य या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. डॉ. रोहिणी अरबट यांनी आहार आणि आरोग्याचा परस्पर संबंध विशद करीत, स्मार्ट बुकिंग व स्मार्ट इटिंग यावर उपयुक्त माहिती दिली. या कार्यक्रमामुळे विद्यार्थिनींमध्ये आहार व आरोग्य विषयी जागरूकता निर्माण झाली. यावेळी डॉ. रोहिणी अरबट यांनी 50 विद्यार्थिनींची दंत तपासणी केली. विद्यार्थिनींना दातांच्या आरोग्याविषयी व दातांची काळजी कशी घ्यावी, याविषयी उपयुक्त माहिती दिली. या कार्यक्रमाचे अध्यक्ष, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ए. एल.कुलट हे होते . त्यांनी आपल्या मार्गदर्शनपर व्याख्यानात गृहअर्थशास्त्र विभागाच्या कार्यक्रमाची प्रशंसा केली. यावेळी कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. स्वाती वैद्य यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रा. मंजू मळसने यांनी केले. त्यावेळी महाविद्यालयातील कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



डॉ. रोहीणी अरबट दंतरोगतज्ञ, खामगाव मार्गदर्शन करतांना.









**At this time, Dr. Rohini Arbat conducted a dental examination**

● रविवार दि.९ सप्टेंबर २०१८ मातृभूमि

# आहार, पोषण व आरोग्य विषयावर मार्गदर्शन

आकोट,दि.८:- स्थानिक श्री शिवाजी महाविद्यालय येथे गृहअर्थशास्त्र विभागाव्दारे आहार, पोषण व आरोग्य या विषयावर खामगांव येथील दंतरोग तज्ञ डॉ.रोहीणी अरबट यांचे मार्गदर्शनपर व्याख्यान आयोजीत करण्यात आले होते.

व्यासपीठावर कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ.ए.एल.कुलट, प्रमुख अतिथी म्हणून कला शाखा प्रमुख डॉ.प्रशांत कोठे, प्रा.एस.पी. कोठेकर, प्रा.स्वाती वैद्य, प्रा.मंजू मळसने व्यासपीठावर उपस्थित होते. उपलब्ध असलेल्या खाद्य पदार्थातून स्मार्ट कुकींग, स्मार्ट इटींग कस होत ?, त्याची आवश्यकता विषद करत गो फर्दर विथ फुड या राष्ट्रीय पोषण



सप्ताहातील थीमवर डॉ.रोहीणी अरबट यांनी मार्गदर्शन केले. प्राचार्य डॉ.कुलट यांनी सुध्दा याप्रसंगी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.स्वाती वैद्य तर संचालन कु.रुपाली नेरकर हिने केले. प्रा.मंजू मळसने यांनी आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी कु.उकळकर, कु.दातकर, कु.भवाने, कु.वसु, कु.फाटकर, कु.साबळे यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमांतर्गत दंत तपासणी करण्यात आली. कार्यक्रमासाठी प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व बहुसंख्येने विद्यार्थी

## श्री शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, आकोट

## गृहअर्थशास्त्र विभाग

### गृहअर्थशास्त्र विभागाद्वारे अन्नसंरक्षण या विषयावर व्याख्यानाचे आयोजन .

उद्देश: अन्न संरक्षणाचे महत्व व अन्न वाया जाऊ नये, उपलब्ध अन्नपदार्थांचा योग्यप्रकारे उपयोग व्हावा, याविषयीची जागृती विद्यार्थिनींमध्ये यावी या उद्देशाने या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले.

दिनांक 19 मार्च 2019 रोजी प्राध्यापक प्रा. सुषमा फरसूले, गोपाळराव खेडकर महाविद्यालय, तेल्हारा यांचे अन्न संरक्षण या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. यावेळी प्रा. फरसुले यांनी. अन्न संरक्षण अर्थ, महत्व व अन्न संरक्षणाच्या विविध पद्धती याबद्दल सविस्तर मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक गृहअर्थशास्त्र विभाग प्रमुख प्रा. स्वाती वैद्य यांनी केले. यावेळी मंचावर प्रा. मंजू मळसने या होत्या. तसेच मोठ्या संख्येने गृहअर्थशास्त्र विभागाच्या विद्यार्थ्यांनी हजर होत्या.





This time by Prof. Farsule. Detailed guidance on the meaning, significance and various methods of food preservation is given.

# श्री शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, आकोट

## गृहअर्थशास्त्र विभाग

## गृहअर्थशास्त्र विभागात स्वयंरोजगार   अर्थ, महत्त्व आणि संधी या विषयावर व्याख्यानाचे आयोजन.

उद्देश: विद्यार्थिनींना स्वयंरोजगार बद्दल माहिती व्हावी व प्रेरणा मिळावी.

दिनांक 23 मार्च 2019 रोजी गृहअर्थशास्त्र विभागाद्वारे स्वयंरोजगार  अर्थ , महत्व आणि संधी या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला प्रमुख वक्त्या म्हणून प्रा. प्राची भांबुरकर, श्रीमती विमलाबाई देशमुख महाविद्यालय, अमरावती या लाभल्या होत्या. यावेळी प्रा. भांबुरकर यांनी गृहअर्थशास्त्रच्या विद्यार्थ्यांना स्वयम रोजगारत संबंधी विस्तृत माहिती दिली. स्वयंरोजगार म्हणजे काय, यासंदर्भात माहिती दिली. तसेच स्वयंरोजगाराचे महत्त्व सांगून या विद्यार्थ्यांना स्वयंरोजगाराच्या संधी कशा उपलब्ध आहेत, याबाबत मार्गदर्शन केले. तसेच आर्थिक भांडवल उभारण्यासाठी बँकांची भूमिका काय आहे. याविषयी माहिती दिली. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक गृहअर्थशास्त्र विभाग प्रमुख प्रा. स्वाती वैद्य यांनी केले. तर कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन कु. रोशनी वडतकार यांनी केले. यावेळी प्रा. मंजू मळसने यांचे सहकार्य लाभले. यावेळी गृहअर्थशास्त्राच्या विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या



**Prof. Prachi Bhamburkar delivered lecture**